जिल्हा परिषदेकडील निरीक्षण वाहन देखभाल व दुरुस्तीसाठी नवीन लेखाशिर्ष निर्माण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः वाहन-२०१७/प्र.क्र.२७/पं.रा.१

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दिनांक: २६ मार्च, २०१८

वाचा -

१) कार्यालयीन आदेश क्र.विसूची-२४१५/प्र.क्र.६३/आस्था-१, दि.२७.१०.२०१६.
२) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई यांचे पत्र क्र.ख.वि./चा-१/ग्रा.वि.वि.ज.सं.वि./ यू.ओ.आर-१५७/२०१६-१७/१८८८, दि. ६ मार्च,२०१७.

प्रस्तावना :-

राज्यातील जिल्हा परिषदांना जिल्हा परिषदेकडील निरीक्षण वाहन देखभाल व दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून दरवर्षी अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. हे अनुदान आता ग्राम विकास विभागामार्फत थेट जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्यासाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यतेसाठी सादर केला होता. वित्त विभागाच्या सहमतीने जिल्हा परिषद अंतर्गत येणारी निरीक्षण वाहन देखभाल व दुरुस्तीसाठी व त्या अनुषंगाने इतर अनुषंगीक खर्चासाठी त्या संबंधिचे लेखाशिर्ष ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यास सार्वजानिक बांधकाम विभागाने मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निरीक्षण वाहन देखभाल व दुरुस्तीसाठी नवीन लेखाशिर्ष निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निरीक्षण वाहन देखभाल व दुरुस्तीसाठी नविन लेखाशिर्ष निर्माण करण्यासाठी पुढीलप्रमाणे लेखाशिर्ष निर्माण करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

मराठीत लेखाशिर्ष	इंग्रजीत लेखाशिर्ष
मागणी क्र.एल-०३	Demand No L-03
२०५९, सार्वजनिक बांधकामे	2059-Public Works
८०-सर्वसाधारण	80-General

१९६ जिल्हा परिषदा/जिल्हास्तरीय पंचायतींना सहाय्य	196-Assistance to Zilla Parishad / District Level Panchayats
(०१) स्थानिक क्षेत्रातील योजना	(01)-Schemes in the Local Sector
(०१) (०२) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदान - बांधकामे निरीक्षण वाहन दुरुस्ती व देखभाल	(01) (02) Purposive Grants to Zilla Parishads under section 182 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 Maintenance and Repairs of Vehicles for inspection of Buildings.
सी.आर.सी.-२०५९४५४९	CRC-20594549
५२-यंत्रसामुग्री व साधन सामुग्री	52-Machinery and Equipment

२. सदर शासन निर्णय महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई यांच्या संदर्भांकित क्र.२ च्या पत्रान्वये तसेच, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४३/अर्थ-१७, दि.०७.०३.२०१७ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेने व सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२६११४०३६५६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Mahadev Gengaje

Digitally signed by Rajendra Mahadev Gengaje
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=aadac6f62a04dc76f59a0a873d1263c7d14f6ea5080bb750bf392303a1a35907, cn=Rajendra Mahadev Gengaje
Date: 2018.03.26 17:30:54 +05'30'

(रा.म. गेंगजे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. विभागीय आयुक्त (सर्व)

२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मंबई.

३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर

४. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
५. संचालक, निवासी व लेखा कोषागार, मुंबई.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
७ .उप सचिव (सर्व), ग्राम विकास विभाग, बाधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४००००१.
८. कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद (सर्व)
९. जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
१०. अवर सचिव, वित्त विभाग (व्यय-१५,अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
११.कक्ष अधिकारी (वित्त-१, ७, ८, ९ व १०), ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई- ४०० ००१.
१२. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प-३),सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१३.नियोजन विभाग (कार्यासन क्र.१४११,१४१४), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
१४. निवड नस्ती (पंरा-१)